# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २२/०७/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २२/०७/२००४ रोजी सभा सुचना क्र. १० दि. १७/०७/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६० चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती महोदय, नमस्कार. तसेच सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी, पदाधिकारी ह्यांना नमस्कार. सन्मा. सभापती महोदय, मला वाटते ह्याच्यानंतर जी सभा होणार आहे त्यात आठ विद्यमान सदस्य रिटायर्ड होणार आहेत म्हणून त्यांच्यासाठी पुढची सभा ही शेवटची सभा राहणार आहे. तर माझी आपणांस अशी नम्र विनंती आहे की, आपले हे जे आठ सदस्य रिटायर्ड होणार आहेत तर मानसन्मानाने आपण त्यांचा समारोप समारंभ या ठिकाणी पुढच्या सभेमध्ये ठेवण्यात यावा आणि या सभेमध्ये सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर आणि मा. आयुक्त यांच्या उपस्थितीत त्यांना शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देवून मान-सन्मानाने त्यांचा समारोप करण्यात यावा.

**मा. सभापती :-**

पुष्पगुच्छ देवून त्यांचा समारोप करण्यास सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, जे गेल्या वर्षी रिटायर्ड झाले त्यांना आपण काहीच दिले नाही. तर आता ह्या सदस्यांना पुष्पगुच्छ वगैरे देण्याची तशी आमची देखील इच्छा नाही.

**आसिफ शेख :-**

त्यांना दोन वर्ष स्थायी समितीमध्ये चांगले काम केले आणि प्रशासनाला चांगले सहकार्य केले आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, तशा सुचना आपण संबंधितांना द्याव्यात.

**शरद पाटील :-**

पान नं. २ मध्ये आम्हाला माहिती पाहिजे आहे. पण बांधकाम विभागाचे येथे कोणीही उपस्थित नाही तर आम्ही ती माहिती कोणला विचारायची?

**मा. सभापती :-**

खांबीतला बोलावण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. २ मध्ये शेवटच्या परिच्छेदात फौजदारी केली आहे. तर त्या ऐवजी फौजदारी केस हा शब्द आला पाहिजे. तसेच, पान क्र. ३ मध्ये सन्मा. सभापती साहेब ह्यांच्या नावाने जी नोंद झालेली आहे. तर त्यांच्या वक्तव्यामध्ये त्यांनी इलेक्ट्रॉन झोन असे आले आहे तर इलेक्ट्रॉनिक झोन असे पाहिजे. आपण हे सुधार केले का?

**प्र. सचिव :-**

तशी दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ७ मध्ये शिवमुर्ती नाईक साहेबांचे एक स्टेटमेंट आहे. कुठले वाहन कुठे आहे ह्याची संपूर्ण माहिती घेउन पुढच्या सभेत ती माहिती देण्यात येईल. तर त्याची माहिती आपल्याकडे आलेली आहे का?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपणांस कुठली माहिती पाहिजे?

**धनराज अग्रवाल :-**

गाड्या कुठे कुठे उभ्या आहेत त्याची माहिती पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण गॅरेजला किती गाड्या दुरूस्तीला दिल्या आहेत आणि त्या कुठे आहेत?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब आणि सर्व सन्मा. सदस्य सद्या चालू स्थितीत एकूण ३३ गाड्या आहेत, बंद स्थितीत एकूण २२ गाड्या आहेत आणि एकूण ५५ गाड्या आहेत आणि बंद असलेली वाहने एकूण १७ आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आता आपण बंद स्थितीत २२ गाड्या सांगितले आहे.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

पाच गाड्या दुरूस्तीला गेलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

२२ गाडया बंद सांगितले आहेत तर आस्थापनेवर एकूण किती वाहने आहेत?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

एकूण ५५ गाड्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

एकूण ५५ गाड्या आहेत आणि आज चालू स्थितीत ३३ गाडया आहेत, तर बंद गाडया किती?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

२२ गाड्या बंद आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

परत ५ बंद गाड्या कुठच्या आहेत?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्या २२ गाड्यांमधल्याच त्या ५ गाड्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्या २२ गाडयामधले जर ते ५ गाड्या आहेत तर बाकीची कुठे गेली, सतरा गाड्या.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब, सध्या एक एक गाडी दुरूस्त होत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आता सध्या १७ गाड्या कुठे आहेत? दुरूस्त होत आहेत ते मान्य आहे. पण ते गॅरेजला आहे, आपल्याकडे आहे, रोडवर आहेत का बेवारशी आहेत, कुठे आहेत?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

खारीगावला डम्पर आणि ट्रॅक्टर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

खारीगावला कोणत्या ठिकाणी?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

खारीगावला स्मशानाच्या येथे, ते दुरूस्त केले नाही त्यामुळे ते त्या ठिकाणी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

नवघर का खारी, दोन स्मशान सेपरेट आहेत.

**प्र. सचिव :-**

खारी बंदरवाडीच्या समोर.

**मिलन म्हात्रे :-**

आपले जे आरोग्याचे कॅबिन आहे तिथे का?

**प्र. सचिव :-**

खारी बंदरवाडी स्मशान भूमी येथे.

**मिलन म्हात्रे :-**

तिथे काय आहे?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

डम्पर आणि ट्रॅक्टर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे झाले २. बाकी ३ चे काय?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

नवघरला डम्पर आणि ट्रॅक्टर आहे आणि एक फ्लाय ओव्हरच्या येथे एक टेम्पो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आणखीन कुठे गाड्या उभ्या आहेत? कारण मागच्या सभेमध्ये आपल्याला सांगितले की, बेवारशी गाड्या कुठेच उभ्या नाही आहेत. पाच गाड्यांचा हिशोब मिळाला.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

शांती स्टार बिल्डर, मिरा रोड, तिथे एक डम्पर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता आपण २२ गाड्या बंद आहेत असे सांगितले आहेत.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

होय, ज्या ७ गाड्या बंद आहेत त्याची लिस्ट दिली.

**मिलन म्हात्रे :-**

आता आपण सांगितले की, २२ गाड्या बंद आहेत. क्लिअर माहिती सांगा. आपण बंद गाड्या २२ सांगता आणि ७ गाड्यांचा हिशोब देता. तर १७ गाड्यांचे काय झाले? मागच्या वेळेला आपल्या उपायुक्तांनी सांगितले की, एकही वाहन बेवारशी नाही आणि हे जे बंद पडलेल्या गाड्या आहेत त्या कुठेतरी आहेत, म्हणजे आपल्या वर्कशॉपमध्ये, विभागीय कार्यालयात, कुठेतरी शेडमध्ये किंवा आपले अधिकृत गॅरेज आहे तिथे उभे असेल त्याचा आपण हिशोब दिला पाहिजे. फक्त ७ गाड्यांचा हिशोब मिळतोय १५ गाड्यांचे काय? कारण कसे आहे आपण ह्या प्रोसिडिंग सोबत उत्तर दिले पाहिजे.

कारण आपण पुढच्या सभेत माहिती द्याल असे सांगतात पण पुढची सभा येउनही गेली. आता हे आपण १७/०६/२००४ च्या सभेचे घेतोय आणि ही कितवी सभा आली आहे ते आपण बघा.

**आसिफ शेख :-**

आपण त्यांना उत्तर द्या असेल तर हो म्हणा आणि नसेल तर नाही म्हणा.

**मिलन म्हात्रे :-**

असे गोलमोल उत्तर देवून चालणार नाही. उपायुक्तांनी काय सांगितले, पुढच्या सभेत सविस्तर माहिती दिली जाईल. हे १७/०६/०४ च्या सभेला आपण सांगितले. उपायुक्तांनी आश्वासन दिले. १७/०६/०४ ते आजची ही सभा आहे इथपर्यंत आपण काय केले? तुम्ही मुख्यालयात बोलता तर आपण हिशोब द्या की, ह्या मुख्यालयात १० गाड्या आहेत, मिरा रोडच्या मुख्यालयात ५ गाड्या आहेत असे आपण आम्हाला सांगा. आज ह्या गोष्टीला जवळ जवळ एक ते दिड महिना झाला. आता आपण २२/०७/०४ च्या सभेत आहोत. म्हणजे एक महिन्यापेक्षा जास्त झाले. सभापती साहेब, आपण मागच्या टेंडरला का मंजूरी दिली तर त्याचे कारण काय दिले त्याची माहिती आहे का की, अनेक गाड्या बंद आहेत. त्या लवकर रिपेअर करून घ्यायच्या आहेत म्हणून ह्याला लवकर मंजूरी द्या असे आपले त्यामध्ये वक्तव्य आहे. आम्ही मागे अंधेरीला प्रशिक्षणाला गेलो, सचिव साहेब स्वतः बरोबर होते. तर पवनपुत्र येथे आमची गाडी बंद पडली. अधिकाऱ्यांना ए.सी. गाडी पाहिजे आणि आम्ही कधी काळी प्रशिक्षणासाठी दोन-तीन महिन्यांनी कोणीतरी नगरसेवक जातो.

**शरद पाटील :-**

तुम्हाला गाडी दिली, कोण आहे आपण पहिले गाडीचा नंबर आम्हाला द्या.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब बरोबर होते. सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी बरोबर होते.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आम्ही गाडीचे नंबर मागितले होते. ते आम्हाला अजून का दिले नाही?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

गाडीचे नंबर आहेत. कोणती कोणती गाडी घेतली ते तुम्हाला वाचून दाखवतो. ए.सी. गाडी मा. उपायुक्त (मु.), दोन सुमो अतिक्रमण विभागाला दिलेल्या आहेत. एक सुमो मुख्यालय दैनंदिन कामासाठी ठेवलेली आहे. एक कॉलीस मुख्य लेखापरिक्षकाला दिलेली आहे. एक कॉलीस कार्यकारी अभियंता पाणी पुरवठ्याला दिलेली आहे. एक व्हॅन नॉन ए.सी. कॅश विभागाला दिलेली आहे. तीन सुमो प्रभाग अधिकाऱ्याला दिलेल्या आहेत. एक व्हॅन प्रभाग अधिकाऱ्याला दिलेली आहे. अशी एकूण बारा वाहने दिलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ही कसली यादी वाचून दाखवली?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

जी भाड्याने वाहने घेतली त्याची यादी वाचून दाखवली आहे.

**शरद पाटील :-**

आपण जे साडे तेरा हजार रूपये देवून स्वतःच्या गाड्या वापरतात त्या गाड्यांचे नंबर पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे तुम्ही टेंडरचे बोलता, ठेक्याने आपण जी भाडोत्री वाहने मागितली त्याचे आणि ह्यांचे असे म्हणणे आहे की, आपण तेरा हजार पाचशे अधिकाऱ्यांना मंजुर केले.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, स्वतःची गाडी आहे त्यांना आपण आठ हजार रुपये भाड्याचे देत होतो. ह्यावर्षी आपण साडे तेरा हजार स्वतःची गाडीकरिता केले ते आम्हाला मान्य आहे. एकंदरित कोणाकोणाची गाडी आहे, त्याचे नंबर काय आहेत, ते वापरतात का, आम्हाला तुम्ही त्याची सविस्तर माहिती दिली पाहिजे.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपणांस ही माहिती आम्ही पुढच्या सभेत देवू.

**धनराज अग्रवाल :-**

पुढच्या सभेत आम्ही असणार का नाही ते आपण आम्हाला सांगा.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपली अजून पुढची एक सभा होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या सभेत कशाला? मुख्य लेखा परिक्षक सांगतील. पुढच्या सभेत असे चार सभा क्रॉस केल्या तरी अजून माहिती मिळत नाही.

**आसिफ शेख :-**

आता जर पुढच्या सभेत द्यायचे तर एक सभा आणखीन वाढवली पाहिजे. एक विशेष सभा लावा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे बघा मागच्या वेळेला आम्ही असेच केले. तुम्हाला एक महिन्याची मुदत दिली. पुढची सभा म्हणजे एक आठवड्याची सभा असते. आता सव्वा महिना झाला तुमची माहिती आलेली नाही. म्हणजे सभापती साहेबांच्या समोर जे रूलिंग झाले त्याला काही किंमतच नाही. आपल्या काही शंभर गाड्या दिलेल्या नाहीत. आपले अधिकारी काही दहा-पंधराजण असतील. तरी ती लिस्ट आपल्या प्रशासनाच्या वतीने बनत नाही. आतापर्यंत त्यांचे पैसे गेले असतील, सगळी चलने गेली असतील. ठराव झाल्याबरोबर पटकन त्याने दुसऱ्या दिवशी दुकान चालू केले असेल.

**मा. सभापती :-**

आपल्याला या विषयाची माहिती पंधरा मिनिटानंतर देण्यात येईल. तोपर्यंत पुढचा विषय घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, हे जे ७ नंबरचे पान आहे. शेवटी दिलेले आहे ०३/०६/२००४ च्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे. आतापर्यंत आम्ही सुचविलेल्या दुरूस्त्या केल्या की नाही? याची कॉपी कुठेच बघायला मिळाली नाही. इतर महानगरपालिकांमध्ये ज्या दुरूस्त्या सुचविलेल्या असतात. त्या प्रोसिडिंगबरोबर दिल्या जातात, ही सुचविलेली सुचना आणि दुरूस्ती. आपण आता याला मंजुरी दिली तर या दुरूस्तीमध्ये आणखी काय असेल ते आम्हाला कळणारच नाही. ती तुम्ही तुमच्याकडे ठेवली असेल. जे ठराव वगैरे येतात तर मागच्या वेळेला जे शेवटच्या दोन लाईन बदलायला लावल्या त्या ठरावाचा या शहराकरिता या प्रशासनाकरिता मोठा इफेक्ट होणार आहे. हे तुम्ही पुर्ण लक्षात घ्या. असे बरेचसे ठराव आम्ही एक दोन वर्षापासून आम्ही बघतो, आम्ही सूचना करतो पण ॲमेन्डमेन्ट काय केले ते कोण दाखवत नाही. आम्हाला त्याची कल्पनाच नसते.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

दुरुस्तीचे पान देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मी हे पुर्ण प्रोसिडिंग सांगत नाही. परत एकदा ऐका, आम्ही ही जी एक लाईनची दुरूस्ती केली आहे की, ही चुक चुकीची आहे. हे बदलून असे करावे. ते बदलले आहे. हे आम्हाला कोणी कधीच दाखविलेले नाही. म्हणजे तुम्ही सब्जेक्ट टु कंडीशन आमच्याकडून ही परवानगी घेतली. उद्या ती काय दुरूस्ती केली आहे किंवा नाही, करावे की नाही करावे, त्याची मुदत असते.

**धनराज अग्रवाल :-**

पानं क्र. १८ मध्ये आपण हे जे प्रस्ताव दिले आहे त्याचे काम शेवटी आहे. उत्तन, भातोडी बंदर, धावगी, बिन्डूक गल्ली, पाली येथे स्ट्रिट लाईट लावणे. तिथे काम सुरू केले आहे का?

**दिपक खांबीत :-**

तिथे काम केले आहे. धावगी आणि बिन्डुक गल्ली. तिथे लाईटचे पोल पडलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

लाईटचे पोल फार दिवसापासून पडलेले आहेत. पण तिथे काम होत नाही.

**दिपक खांबीत :-**

साहेब, पाउस पडतो म्हणून काम होत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, पाऊसच पडत नाही. कुठे पाउस पडतो? तुम्ही सांगता पाऊस पडतो म्हणून काम होत नाही.

**दिपक खांबीत :-**

मी स्वतः फॉलोअप करतो.

**आसिफ शेख :-**

पान नं. ३० मध्ये ठराव क्र. ३७, मिरा भाईंदर क्षेत्रात अंध, अपंग, मुक व बधिर हा ॲडिशनल शब्द आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. ३१ मध्ये सगळी चर्चा झाल्यानंतर आम्ही काही सुचना सुचविल्या होत्या. त्याच्यामध्ये काही सदस्यांकडून पण काही सुचना झाल्या होत्या. ते आहेत तसेच स्टिरिओफोनिक दिलेले आहे.

**एस. आर. शेंडे :-**

ते जे आहे ते करेक्टेड आहे.

**आसिफ शेख :-**

त्या सुचनांमध्ये सांगितलेली एक अशी सुचना होती की, सन्मा. स्थानिक नगरसेवक यांचे एक शिफारस पत्र घ्यावे. तर ते त्यामध्ये ॲड करून घ्या आणि हे जे आपण त्यामध्ये म्हटले की, वाहन विभागाचा आपल्याला दाखला पाहिजे तर तो रद्द करून टाका आणि स्थानिक नगरसेवकांचा त्यामध्ये उल्लेख करा म्हणून सांगितले होते तर तो उल्लेख त्यामध्ये नाही आणि शक्यतो स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण आर.टी.ओ.चे कुठे रद्द केले आहे.

**एस. आर. शेंडे :-**

साहेब, दुध केंद्रासाठी जागा देणे याच्यात ते ४ नंबरला आपण बघा.

**मिलन म्हात्रे :-**

पण तुम्ही ह्याच्यामध्ये दिलेले नाही की, वाहतुकीचा विचार करून देण्यास हरकत नाही.

**एस. आर. शेंडे :-**

त्याच्यात अगोदर होते की, वाहतुक शाखेचा ना हरकत दाखला घेऊन देण्यास हरकत नाही. आता विद्यमान व भविष्यातील वाहतुकीचा विचार करून.

**मिलन म्हात्रे :-**

मग हा विचार कोण करणार?

**एस. आर. शेंडे :-**

महानगरपालिका करणार.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे ते प्रशासनाकडून पाहिजे. मग ते तुम्ही परत आर.टी.ओ.ला रेफर कराल. वाहतुक म्हणजे आर.टी.ओ. आले. याच्यामध्ये तुम्ही असे केले पाहिजे आपल्या स्थानिक मनपा विभागाकडून म्हणजे आपल्या भविष्यातील वाहतुकीचे त्याच्यात तुम्ही मेनशन करा. नाहीतर परत कोणीतरी अमेन्डमेंट करेल आणि आर.टी.ओ.कडे पाठवाल आणि मग ते तसेच चालत राहिल.

**हॅरल बोर्जीस :-**

हे आता फायनल झाले आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

१९९७ साली तुम्ही यांना लायसन्स द्यायचे बंद केले. तरी भरपूर लायसन्स दिले गेले. अजूनदेखील लायसन्स देण्याचे चालू आहेत. मागच्या वेळेला ठराव पास झाला आणि लायसन्स बंद केले पण लायसन्स द्यायचे चालू आहे.

**मोहन पाटील :-**

प्रकरण ३१ च्या १५ नंबरला दिले की, शिवाजी छत्रपती महाराज रोडवर ठेवायचे नाही तर त्याच्यामध्ये आपण असा उल्लेख करा की, नो हॉकर्स झोन द्यायचे नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

१० नंबरला ते इनक्ल्यूड झाले आहे.

**आसिफ शेख :-**

प्रत्येकाचे ते वेगवेगळे आहेत.

**शरद पाटील :-**

फुटपाथवर ठेवायचे नाही असे आपले ठरले आणि फुटपाथ आपण चालण्याकरिता केले आहे. जर ते बंद केले तर फायदा काय? आपण फुटपाथ कशाकरिता केले आहे?

**हॅरल बोर्जीस :-**

वाहतुकीचे रस्ते अथवा नो हॉकर्स झोन ह्यावर परवानगी देण्यात येवू नये असे इनक्ल्यूड आहे.

**एस. आर. शेंडे :-**

आपल्या रस्त्यावर द्यायचे या अन्य रस्त्यावर द्यायचे हा विषय आहे.

**शरद पाटील :-**

नो हॉकर्स झोन आहे त्या रस्त्यावर द्यायचे नाही असे ठरलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

गटारावर द्यायचे नाही.

**शरद पाटील :-**

मेन रोडचा फुटपाथ आहे. त्याच्यावर दुकान देता येणार नाही. बी.पी. रोड म्हणा, नवघर रोड म्हणा, मेन रोड आहेत. तिथे फुटपाथवर जर ठेवले तर लोक चालणार कुठून?

**मिलन म्हात्रे :-**

आपण फुटपाथवर परमिशन देणार का?

**एस. आर. शेंडे :-**

रस्त्याच्या जागेमध्ये स्टॉल देण्याचाच विषय आहे. रस्त्याच्या बाहेर ज्या खाजगी जागा आहेत त्याच्यात जर द्यायचे असेल तर ही पॉलिसी ठरवायची आवश्यकता नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझा काय प्रश्न आहे, आपण फुटपाथवर देणार का नाही?

**शरद पाटील :-**

आपण ठरवा,फुटपाथ कशाकरिता बांधले आहेत तर त्यांना द्यायला बांधले आहेत का?

**मोहन पाटील :-**

इमारतीला सोडून जागा आहेत, सगळे आहे. मिरा भाईंदरमध्ये गटारे ओपन होती आपण ओपन गटारे बंद केली. बंद करून त्यावर लाद्या लावल्या. त्याच्यावर स्टॉल उभे केले. मग त्या फुटपाथचा काय उपयोग आहे?

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलतात हे अगदी बरोबर आहे. सभापती साहेब, काशिमिरा चेकनाक्याला फुटपाथवर जवळजवळ दहा ते बारा गाळे बांधले आहेत. ते शटरवाले गाळे आहेत. कोणाची परमिशन आहे.

**मा. सभापती :-**

रस्त्याच्या रुंदीकरणामुळे तोडले असतील म्हणून वाढीव बांधकाम करण्याची परमिशन शिवमुर्ती नाईक साहेबांनी दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

फुटपाथवर.

**मा. सभापती :-**

फुटपाथ आहे किंवा फुटपाथ सोडून त्या रोडला बांधलेले आहे. तेवढे मला माहिती आहे. त्या रोडला दिले आहे तेवढी मला माहिती आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, फुटपाथवर बांधले असतील. तर आपण पर्यायी जागा शोधा असे आपण सांगायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे तुम्ही एकीकडे अंध आणि अपंगांना हा न्याय लावणार. दुसरीकडे भलतेच काहीतरी करणार. चेक नाक्याच्या बाजुला बारा गाळे पक्के गटारावर बांधले आहेत.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आता जे विषय चालला आहे. त्या विषयावर पहिलीदेखील चर्चा झालेली आहे की, फुटपाथवर कुठचीही वस्तु द्यायची नाही आहे. आपण जर फुटपाथवर दिले तर आपण फुटपाथवरून कुठून चालणार? मेन रोड जिथे आहे, तिथे नाहीच नाही.

**मोहन पाटील :-**

ए.टी.पी साहेब, फुटपाथ सोडून जागा आहेत.

**मा. सभापती :-**

तसे सांगा की, फुटपाथ सोडून द्या.

**एस. आर. शेंडे :-**

महापालिकेची जागा असेल तर त्याच्यावर देता येईल.

**मोहन पाटील :-**

आम्ही आजवर जे टेलिफोन बुथ बांधले आहेत, आरे सरिता आहे तर आम्ही प्रायव्हेट इमारतीची शिफारस घेतो आणि तिथे बांधायला परमिशन देतो. फुटपाथवर जर आपले स्टॉल ठेवायला लागले तर सगळे फुटपाथ निघून जाईल.

**एस. आर. शेंडे :-**

प्रायव्हेट जागेत जर द्यायचे असेल तर ही पॉलिसी ठरवायची आवश्यकता नाही.

**मोहन पाटील :-**

साहेब, तुमच्या लक्षात येत नाही जर फुटपाथवर दिले तर आपण रस्त्यावरून कुठून चालणार?

**आसिफ शेख :-**

त्यामध्ये आपण अट टाका की, फुटपाथवर करता येणार नाही.

**मोहन पाटील :-**

मुख्य रस्त्याचे फुटपाथ आहेत. जसे बी.पी. रोडवर फुटपाथ आहेत तिथे द्यायचे नाही.

**आसिफ शेख :-**

आपण आता निर्णय घेतला की, फुटपाथवर द्यायचे नाही. तर तशी अट टाका की, फुटपाथवर देता येणार नाही.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब, पण दुसरीकडे जागा उपलब्ध नाही.

**आसिफ शेख :-**

जिथे जागा उपलब्ध होईल तिथे देवून टाकायचे.

**मोहन पाटील :-**

उपायुक्त साहेब, फुटपाथ पण देण्याकरिता असे त्या ठिकाणी पक्के लिहा अशी पॉलिसी मॅटर आपण हे करू या. फक्त फुटपाथवर देण्याकरिता पॉलिसी. मग आण मा. महासभेत जावून बोलू.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलले. ते चांगले वकतव्य केलेले आहे की, हे जर फुटपाथवर द्यायचे नाही अशी अटीशर्ती टाकली तर ए. टी. पी. डिपार्टमेंटने निवांत बसायचे की एक पण तुमचे एन.ओ.सी बाहेर निघणार नाही. दुसरी गोष्ट आता जे फुटपाथवर लागलेले आहे ते ताबडतोब काढायचे.

**शरद पाटील :-**

ते काढलेले आहे. काढायचे कधीच ठरलेले आहे.

**रिटा शाह :-**

ठरलेले आहे पण ते काढतात कुठे?

**मिलन म्हात्रे :-**

जे काही सहा की, दहा गाळे आहेत त्यांना आयुक्त साहेबांनी कुठच्या अधिकारात फुटपाथवर परमिशन दिलेली आहे? साहेब, नियम-कायदा सगळयांना सारखा आहे. आम्ही देखील मग डी.पी. रोडवरील असे दहा प्रकरण पाठवून देतो.

**मा. सभापती :-**

कुठल्या फुटपाथला आहे?

**मिलन म्हात्रे :-**

जो मेन काशिमिरा चेक नाका आहे, त्या ठिकाणी ते गाळे सर्व पक्के झालेले आहेत.

**मा. सभापती :-**

ते सर्व तोडणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कधी?

**मा. सभापती :-**

या आठ दिवसांत.

**मिलन म्हात्रे :-**

कोण बोलते?

**मा. सभापती :-**

मला आयुक्त साहेबांनी सांगितले आहे.

**दिपक खांबीत :-**

ते सहा गाळे आहेत त्यांना पाठीमागे रस्ता नसल्यामुळे ते टेम्परररी बांधलेले आहेत. ते सर्व गाळे तोडणार आता पाठीमागे रस्ता नसल्यामुळे ते टेम्पररी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तसे लिहा की, हे सदर गाळे टेम्पररी आहेत. उद्या दोन-चार लाखाला ते विकून गेले तर ती भानगड तुमच्या गळयाशी येईल. आता शटर वगैरे बांधलेले आहे. तुम्ही जर टेम्पररी परमिशन दिली तर तिकडे तसे लिहा. आता तो दुकानदार जर विकून निघून गेला मग?

**आसिफ शेख :-**

तिथेच ॲडीशनल करून टाका. फुटपाथवर देता येणार नाही. एकदम चांगला रामबाण उपाय. पान नं. ३२ वर अंध, अपंग आणि मुक-बधिर करा आणि अनुक्रमांक ८ मध्ये सदर स्टॉलकरिता जागा देताना वाहतुक शाखेचा अभिप्राय घ्यायचा आहे हे ठरल्याप्रमाणे रद्द करून टाका. त्यानंतर हस्तांतर फी जी रूपये दोन हजार म्हटलेली आहे ती पाचशे रूपये निश्चित झालेली आहे. मला वाटते दोन हजार रूपये हे चुकीने आलेले आहे. तर ते पाचशे रुपये करुन घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

वर पण दोन हजार आलेले आहे.

**आसिफ शेख :-**

ते बरोबर आहे आपण ठरवल्याप्रमाणे केलेले आहे. मागे ठरले आहे आपण मागचे वक्तव्य बघून घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

३१ मध्ये देखील दोन हजार आले आहे.

**आसिफ शेख :-**

ते दोन हजार रूपये ठरलेली रक्कम आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मग हे पाचशे ठरले आहे ते.

**आसिफ शेख :-**

आरे सरिता दोन हजार रुपये आणि अंध-अपंगांसाठी बुथ आहे ते हस्तांतरित फी पाचशे रूपये ठरले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

३१ नंबरला पाच हजार रूपये जमा करण्यात यावे. या फिगरचे फायनल करा.

**मोहन पाटील :-**

हा विषय मा. महासभेला जाणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेला जाणार आहे असे बोलून चालणार नाही. याठिकाणी आपली चर्चा चालू आहे. इकडे जे फायनल होते त्याच्यात जो आपला बदल झालेला आहे. तो दिलेला नाही. आता वाहतुक शाखेचा नियम वगळण्यात आला. मागे लाईन आहे ना? ते सांगतात आम्ही सुधारून पाठवले, ते प्रिन्ट होवून आले आहे.

**आसिफ शेख :-**

म्हणून डिलीट करायला सांगितले.

**मिलन म्हात्रे :-**

ते बोलतात ही सगळी सुधारित आवृत्ती आहे. मग डिलीट कशाला करता? ही जर सुधारित आवृत्ती आहे तर डिलीट कसे काय करता येईल.

**आसिफ शेख :-**

आपले वक्तव्य झाले की ते नकोच.

**मिलन म्हात्रे :-**

मग ते आले कसे?

**आसिफ शेख :-**

ते चुकीने आले.

**हॅरल बोर्जीस :-**

मागे जेव्हा ह्या विषयावर चर्चा झाली की, वाहतुक शाखेचा अभिप्राय रद्द करावा असे सर्वानुमते ठरलेले आहे. मग ते परत तिन्ही ह्याच्यामध्ये कसे आले?

**प्र. सचिव :-**

प्रशासनाकडून जो ठराव आला तोच आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

त्याच्यामध्ये दुरूस्ती करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

अमाउन्टचे काय? फी बद्दल देखील आम्ही बोललो.

**आसिफ शेख :-**

३२ नंबरला सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. ३१ आहे तर पाच हजार रूपये जमा करून घेण्यात यावे. जी अनामत रक्कम पाच हजार रूपये ठेवलेली आहे. ती आम्ही दोन हजार रूपये सुचवलेली होती. दोन हजार रुपये हस्तांतरण फी तिथे पाचशे रूपये केलेली होती.

**आसिफ शेख :-**

पान नं. ३२ च्या आठवर जे सदर जागा देताना आहे ते डिलीट करून टाका आणि १० नंबरमध्ये हस्तांतरण फी दोन हजार रूपये चुकून आलेली आहे. ती पाचशे रूपये पाहिजे. पान नं. ३३ वर सिरीयल नं. ८ वाहतुक शाखेवर आहे. ते पण रद्द करून टाका आणि क्र. १० हस्तांतरण फी बरोबर आहे.

**प्र. सचिव :-**

२४/०६/२००४ चे इतिवृत्तांत घेत आहे.

**आसिफ शेख :-**

पान नं. ७ वर आपण ठराव क्र. ४१ मध्ये म्हटले आहे की, मा. आयुक्त यांनी एक समिती गठित केली आहे आणि या समितीचे प्रमुख म्हणून श्री कल्याण केळकर उपायुक्त (मुख्यालय) यांची नेमणून केलेली आहे. मग बाकीची जी समिती नेमली तर आपला विषय होता पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करण्याबाबत आणि विषयामध्ये समिती नेमलेली आहे ते कसे काय आले?

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, सभा झालेली आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या आठवडयापासून आपल्या महापालिकेमध्ये दोन्ही ईस्ट, वेस्ट कडील एस.आय नाही आहेत. डॉक्टरांची तब्येत बरोबर नाही. पण आपण जो आपत्कालीन कक्ष उघडला आहे. त्याच्यावर जे अधिकारी नेमलेले आहेत त्याचा देखील रात्री इकडे ठिकाणा नसतो. त्या कक्षाचा काय उपयोग आहे? काहीही उपयोग नाही. तो बंद करून टाका. अधिकारी नेमायचा त्याला पगार द्यायचा, त्याला ओव्हरटाईम द्यायचा आणि तिथे कोण नसते. म्हणजे आपली कागदावर खानापुरती आपण पुरी केली.

**आसिफ शेख :-**

समितीला वैज्ञानिक अधिकार दिलेला आहे का? त्याची सभा होणार आहे का? त्यांना काय काय परमिशन देणार आहेत. त्यांना इंडस्ट्रीचा परवानगी देण्याचा त्यांना अधिकार आहेत का? काय असेल ते स्पष्ट करा. म्हणजे नुसती समिती स्थापून काय केले? समिती कशापद्धतीने व कोणत्या आधारे स्थापन केली आणि स्थापन केले तर त्यांना वैज्ञानिक अधिकार दिले का? नुसती स्थापन करून उपयोग आहे का?

**मा. सभापती :-**

मंजुरी दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मंजुरी दिली ते मान्य आहे. पण पुन्हा त्याना वैज्ञानिक अधिकार दिले का? पुन्हा अध्यक्ष तर त्याच्यामध्ये सभापती राहणार आहेत. आपण त्यांच्या सभा घेतल्या का?

**धनराज अग्रवाल :-**

अभ्यास करून एक महिन्यात रिपोर्ट द्यायचे होते आणि आता दोन महिने झाले.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्यावेळेस माझ्या संभाषणात मी सुचना केल्या होत्या, स्मॉल स्केल मधून येणारा जो केमिकलचा कचरा, प्लॉस्टिक वगैरे आहे, या सर्वांचा सर्व्हे करा. पण अजून सर्व्हे झालेला नाही, सव्वा महिना होत आला. एक महिन्याचा टाईम दिला होता आता सव्वा महिना झाला.

**आसिफ शेख :-**

केळकर साहेबांच्या नावाने अपॉइन्टमेंट आहे. मग त्यांच्या जागी कोण येणार आहे आणि जे सदस्य रिटायर होणार आहेत त्यांच्या जागी कोण येणार आहे? ही समिती बनविताना पदानुसार समिती बनविली आहे की कसे काय?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, आसिफ शेख याचा सविस्तर अहवाल पुढच्या सभेला देण्यात येईल.

**आसिफ शेख :-**

माझ्या बोलण्याचा असा उद्देश आहे की, अशा समित्या बनल्या पाहिजे. पण त्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले पाहिजे. विषयामध्ये समिती बनविणे कितपत योग्य आहे. आता विषय होता पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणेबाबत. मा. आयुक्तांनी मंजुर केलेला अवलोकनार्थ विषय होता आणि त्या ह्याच्यामधून आपण समिती गठित केली.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

पुढच्या सभेत सांगतो.

**आसिफ शेख :-**

मग तोपर्यंत आपण विषय पेन्डींग ठेवायचा का?

**मिलन म्हात्रे :-**

पाणपट्टे साहेब, असे आहे की, आता आमच्या काही सुचना ह्याच्यामध्ये आहेत. तो जो तुमचा अहवाल तयार झालेला आहे त्या अहवालाबाबत डॉक्टरसाहेबांनी पहिले सांगितले की, हा परिपुर्ण आहे. त्याच्यानंतर त्याच्यामध्ये ज्या काही सुचना आहेत त्या आम्ही सांगितल्या, ज्या अहवालावर आम्ही सर्वांनी चर्चा केली.

**मोहन पाटील :-**

सभा झाली की नाही झाली याचा अहवाल पुढच्या सभेला घेउन या.

**आसिफ शेख :-**

त्यांना काय-काय अधिकार दिले, ते अधिकार तर क्लिअर होवू दे. संपूर्ण मिरा भाईंदर शहराच्या इंडस्ट्रीचे अधिकार, लायसन्स द्यायचे अधिकार क्लिअर होवू दे.

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समितीचे सभापती या ठिकाणीच आहेत, सभा झाली की नाही झाली ते त्यांना माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ती सभा बोलवा. कारण आमच्याकडे जे अहवाल बनलेले आहेत, त्यामध्ये आमच्या वॉर्डचा उल्लेख आहे. त्याच्यात क्युरी आहेत. सर्व चुका आहेत. त्या सुधारण्याकरिता एक महिना दिला. आमच्याकडे अजून अहवाल आलेला नाही आहे.

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेबांचे काही नाही. ते मनाळे साहेबांनी घेतले.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, तसे नाही. मी काय बोलतो, तुमचा वॉर्ड आमच्या बाजुला आहे. यांच्या बाजुला आहे. तिथे इंडस्ट्री आहे, सगळे काही आहे, त्यात काही सुचना आहेत. अहवालच आपल्याला दाखविलेला नाही आहे. याच्यातील कुठल्या सदस्याला अहवाल मिळाला आहे ते सांगा आणि आपण त्याच्यावर पाहणी केली अहवाल तयार झाला आहे. ग्रीन कोर्ट क्लबला तो छोटासा अहवाल वाटला गेला. माझ्याकडे त्याची कॉपी आहे.

**मा. सभापती :-**

या अहवालाला काही अर्थ नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. तुम्ही जो अहवाल म्हणता तो त्याच्यामध्ये नोंद केलेली आहे. आम्हाला ग्रीन कोर्ट क्लबला त्या अहवालापैकी संक्षिप्त अहवाल दिला गेला आहे.

**मा. सभापती :-**

आपला लायसन्स देण्याबाबत विषय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

लायसन्सचा विषय संपला. हा निराळा विषय सुरू झाला जो इनव्हायरमेंटचा आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, याठिकाणी विषय होता प्रकरण क्र. ३३ पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणेबाबत, अवलोकनाचा विषय होता आणि ह्या अवलोकनाच्या विषयामध्ये आपण काय केले, तर समिती स्थापन केलेली आहे. मा. आयुक्तांनी एक समिती गठित केली आणि ह्या समितीचे प्रमुख म्हणून कल्याण केळकर उपायुक्त (मु.) ह्यांची नेमणूक केली. एवढे त्या अहवालामध्ये म्हटले आहे. मग त्याच्यानंतर आपण सभेमध्ये आणखीन एक समिती स्थापन केली. याविषयामध्येच समिती स्थापन केली ते कितपत योग्य आहे आणि त्याला आपण वैज्ञानिक अधिकार दिले आहे का, समितीचा कालावधी निश्चित केला आहे का, किती वर्षासाठी समिती राहिल आणि आता कल्याण केळकर उपायुक्त, मुख्यालय यांची बदली झालेली आहे. तर तेच पदसिद्ध राहतील का? ह्याचे संपूर्ण असे क्लेरीफिकेशनच होत नाही. आता सन्मा. सभापती त्याचे अध्यक्ष राहतील. ह्याचे नीट क्लेरीफिकेशन होत नाही.

**मा. सभापती :-**

म्हणून हा विषय सोडून आपण प्रोसिडिंग दुसऱ्या सभेमध्ये घेवू.

**मिलन म्हात्रे :-**

सोडून म्हणजे काय करणार? म्हणजे पुढच्या सभेला.

**मा. सभापती :-**

नाही झाले तर हे कॅन्सल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, कॅन्सल करून चालत नाही. आपल्याला त्याला बंधन आहे. त्यांना माहिती आहे काय बंधन आहे.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

पुढच्या सभेत माहिती देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

त्या बंधनाबद्दल कुणीच काही बोलत नाही. साहेब, आपल्याला टाईम बॉण्ड लिमिट आहे, आहे की नाही.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

३१ जुलैच्या आत.

**मिलन म्हात्रे :-**

३१ जुलै आहे तर आता तुम्ही सांगणार आणि त्याला आणखीन किती तुम्ही डि-ले करणार? आणि त्याला जबाबदार कोण? सभापती म्हणून तुम्ही जबाबदारी घेवू शकता का? प्रशासनाने चुका करायच्या आणि ते आपण भोगायचे का? ३१ जुलै शेवटची टाईम बॉण्ड लिमिट आहे. कोणीही ह्याच्यातला अधिकारी बोलत नाही की, टाईम बॉण्ड लिमिट कधीची आहे. हे सगळ्यांना बंधनकारक आहे. सन २००१, २००२, २००३, २००४ ह्या साली ही आपण बनवले नाही. आता आणखीन किती मुदत द्यायची ती सांगा.

**मा. सभापती :-**

नाही आले तर आपण नामंजुर करु.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, प्रश्न नामंजुरीचा नाही आहे. हा बनवलाच पाहिजे. तुम्ही असे बोलू शकत नाही.

**मोहन पाटील :-**

साहेब, तुम्हाला नामंजुर करता येणार नाही. तुम्ही पुढच्या वेळेला सभा बोलावून त्याचा अहवाल तुम्ही आणा. त्या अहवालावर चर्चा करून घ्या. प्रोसिडिंगमध्ये विषय आल्यानंतर तसे कॅन्सल होत नाही, तुम्ही असे कसे बोलता? ही चर्चा झालेली आहे म्हणून तो विषय आलेला आहे.

**मा. सभापती :-**

प्रशासनाने मंजुरीसाठी बरोबर ठेवला नाही तर मग आपण काय करणार?

**मोहन पाटील :-**

मग असे बोला ना, साहेब प्रशासनाकडून व्यवस्थित माहिती द्या.

**आसिफ शेख :-**

प्रशासनाकडून माहिती घ्या. जी समिती गठित केली त्याला वैज्ञानिक दर्जा दिला गेला आहे का? त्या समितीचा कालावधी काय राहिल, कोणकोणते सदस्य राहतील. त्याचा पुर्नविचार करा.

**मा. सभापती :-**

काय करायचे ते आपण पुढच्या सभेत ठरवू.

**मिलन म्हात्रे :-**

३१ जुलैच्या अगोदर त्यांच्याकडून तो रिपोर्ट मागवा. व अधिकारी रिपोर्ट देणार नाही तो त्याला जबाबदार राहिल. त्याला ते बंधनकारक आहे. असा तुमचा आदेश आला पाहिजे. कोणीही असू दे. समजा बावस्कर साहेब आणखीन दोन महिने नसतील म्हणून आपण कोणाला तरी तो ॲडीशनल चार्ज द्या. आपली ३१ जुलै तारीख बघा, बावस्कर हे प्रतिनियुक्तीवर आहेत. त्यांना तसा डायरेक्ट इफेक्ट पडणार नाही. तुम्ही सभापती आहात. आम्ही सदस्य आहोत.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब डॉक्टर साहेब हे प्रतिनियुक्तीवर नाही आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही प्रतिनियुक्तीवर कराल. तुम्ही ठराव काहीही करता.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले की, डॉ. बावस्कर प्रतिनियुक्तीवर आहे की नाही याचा खुलासा करावा.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब, डॉक्टर बॉवस्कर हे प्रतिनियुक्तीवर नाही. ते ठेका पद्धतीने येथे काम करत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचा चार महिन्याचा पगार झाला आहे का?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

ते आस्थापनाला विचारावे लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून बोलतो की, ते प्रतिनियुक्तीवर आहेत. त्यांना पगार नाही म्हणून ते अजून कार्यरत आहेत. आम्ही बोलतो त्या प्रत्येक ह्याच्यामागे अर्थ असतो. त्यांना पगार दिलेला नाही. त्यांचा तुम्ही ठराव सभागृहामध्ये पास करता. पगार द्या आणि मग ठराव पास करा. तुम्हाला जो विरोध करायचा असेल तो तुम्ही करा. जो माणूस आपल्या इकडे आस्थापनेवर नाही आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ही लोकशाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कसली लोकशाही? फुकटचा बसून पगार द्यायचा का? जो कामावर हजर नसतो त्याला पगार बंद असतो व जो कामावर असतो त्याला पगार मिळतो. ह्या ३१ जुलैपर्यंत याची पोझीशन तुम्ही फिक्स अप करा. आम्हाला याचा रिपोर्ट पाहिजे. उद्या जर ३१ जुलैपर्यंत तुमच्याकडे काही हयगय झाली तर आम्ही त्याला सोळा सदस्य जबाबदार ठरणार हे लक्षात ठेवा. हे प्रशासनाचे काम आहे. आम्ही बसून अहवाल तयार करत नाही.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

हा विषय मा. महासभेत ठेवायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही महासभा कधी लागणार?

**मा. सभापती :-**

मा. महासभा २ तारखेला लागणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे तुमचा ३१ जुलै गेला. स्थायी समितीने काय केले? या सभागृहात येवून हा अपूर्ण राहिलेला विषय आहे. स्थायी समितीने काय केले याचे उत्तर तुमच्याकडे आहे का? अजून ३१ जुलैला वेळ आहे.

**मा. सभापती :-**

डॉक्टर आजारी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

डॉक्टर आजारी आहेत, ते सोडून द्या. बाकीचे काय ते सांगा. सगळेच अधिकारी आजारी आहेत का? असे नाही आहे. डॉक्टर आजारी आहेत म्हणजे सगळे आरोग्य खाते बंद आहे का? ३१ जुलैपर्यंत आम्हाला सर्व डिटेलमध्ये पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, सांगतात तोपर्यंत पेन्डींग ठेवा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आज आरोग्य डिपार्टमेंटचा आपल्याकडे कोणच अधिकारी नाही. त्यांच्या जागेवर कोणीतरी पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आपले ह्याच्यावर काय ठरले आहे? फायनल काय ते सांगा.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

पुढच्या सभेत सविस्तर अहवाल दिला जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

कोणत्या सभेत?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

२९ तारखेच्या सभेत.

**मिलन म्हात्रे :-**

सविस्तर, परिपुर्ण असा अहवाल आला पाहिजे. ती आता प्रशासनाची जबाबदारी आहे. आयुक्त साहेबांनी ठरवावे कोणी करायचे ते. साहेब, १४ नंबर ठरावात शेवटी जे हाताने नोंद केलेले आहे ठराव क्र. ४४ बहुमताने मंजुर त्याची नोंद कुठे आहे?

**आसिफ शेख :-**

सर्वानुमते पाहिजे होते.

**प्र. सचिव :-**

तुमचा विरोध होता.

**मिलन म्हात्रे :-**

हो. मग ते कुठे नोंदवलेले आहे ते सांगा.

**प्र. सचिव :-**

माझा विरोध आहे असे तुम्ही म्हटलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बहुमताचा अर्थ काय?

**प्र. सचिव :-**

बहुमताने म्हणजे सगळ्यांच्या संमतीने.

**मिलन म्हात्रे :-**

माझा विरोध कुठे आला?

**प्र. सचिव :-**

इतिवृत्तांताच्या चर्चेमध्ये विरोध आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही. फक्त पंधरा सदस्य आणि मी सोळावा.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, मतदान झालेले नाही, फक्त तुमचा विरोध इतिवृत्तांतात लिहिण्यात आलेला आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, तुमचा विरोध इतिवृत्तांतात नोंदविलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ह्याच्यामध्ये काही चुका असतील तर त्याला जबाबदार आम्ही आहोत. सचिव जबाबदार नाहीत. त्यांना क्षमापन होते, आम्हाला क्षमा होणार नाही आणि इतिवृत्तांत सुचविलेल्या दुरूस्तांसह मंजुर असे पाहिजे. कारण त्यांनी दिलेली परत दुरूस्ती नंतर केलेली आहे म्हणजे इतिवृत्तांताच्या दुरूस्तीमध्ये परत दुरूस्ती झालेली आहे. हे लक्षात घ्या.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभागृहाला गाड्यांच्या नंबरची सविस्तर माहिती देण्यात आली.

**प्रकरण क्र. ६० :-**

दि. १७/०६/२००४ व दि. २४/०६/२००४ रोजीचे मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६९ :-**

दि. १७/०६/२००४ व दि. २४/०६/२००४ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.०० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**